# प्रकरण ६ वे.

## निष्कर्ष व शिफारशी

६.अ) निष्कर्ष

१) शाळामंडळ

२) शाळामंडळातील प्रशासनाधिकारी

३) शाळामंडळांचे सभापती

४) नगरपालिका व शाळामंडळ

५) सरकार व शाळामंडळ

६.ब) शिफारशी

१) शाळामंडळ

२) प्रशासनाधिकारी.

३) नगरपालिका व शाळामंडळ

४) शासन व शाळामंडळ.

६.क) पुढील संशोधनासाठी सूचना.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

# प्रकरण ६ वे.

## निष्कर्ष व शिफारशी

मागील प्रकरणात प्रश्नावली व मुलाखती या संशोधन साधनांच्या साहाय्याने मिळविलेल्या माहितीचे संकलन व पृथ:क्करण केलेले आहे; निष्कर्ष काढले आहेत. या प्रकरणात काढलेले निष्कर्ष एकत्र करावयाचे आहेत आणि योग्य शिफारशी करावयाच्या आहेत.

६.अ) निष्कर्ष :

१) शाळामंडळ

(१) प्रशासनाचे काम कार्यक्षमतेने करता यावे म्हणून आवश्यक असणारी परिस्थिती शाळामंडळात नाही.

(२) शाळामंडळातील सभासदच कामात अडथळे निर्माण करतात.

(३) शाळामंडळात सरकारी प्रतिनिधी असावा.

(४) शाळामंडळात निवडून येण्याबाबत सध्याची जी व्यवस्था आहे ती बदलण्यात येवू नये.

(५) शाळामंडळात निवडून येणाऱ्या सभासदांची वयोमर्यादा खाली आणण्याची जरूरी नाही.

(६) शाळामंडळात निवडून देण्यात येणाऱ्या सभासदाला शिक्षण क्षेत्रातली पदवी असावी.

(७) शाळामंडळातील सभासदांमध्ये एक सभासद शास्त्र विषयाचा असावा.

(८) शाळामंडळाच्या कार्यालयात लेखापालाची जागा निर्माण करावी.

(९) शाळामंडळाच्या होणाऱ्या सभांचा खर्च वाढविण्यात यावा.

(१०) शाळामंडळाच्या सभा दर महिन्याला होतात.

(११) शाळामंडळाच्या सभेची कार्यसूची सभापती व प्रशासनाधिकारी एकत्रितपणे ठरवितात. त्याबाबतचे अधिकार शाळामंडळाला आहेत.

(१२) कार्यालयीन कर्मचाऱ्यासाठी प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी.

(१३) शाळामंडळात इंजिनिअरिंग खाते काढून त्यामार्फत शाळा बांधणे, त्या दुरुस्त करून चांगल्या अवस्थेत ठेवणे, शाळांतील अंतर्गत रस्ते बांधणे, क्रीडांगणाची देखभाल करणे अशी कामे करवून घ्यावीत.

(१४) शहरांतील प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांची संख्या २००० पर्यन्त गेली कीं, दोन लेखनिक व एक लेखापाल नेमण्यात यावा.

(१५) शाळामंडळाचा कार्यालयीन किरकोळ खर्च निश्चित करून त्यावर अनुदान द्यावे.

(१६) शाळेसाठी आवश्यक असलेल्या शिक्षकांची संख्या ठरविण्याचे आदेश मे महिन्यात द्यावेत व जुलैअखेर संख्या निश्चित करावी.

(१७) आवश्यक असलेल्या शिक्षकांची संख्या ठरवितांना मुख्याध्यापक वगळून ठरविण्यात यावी.

(१८) खात्यात काम करीत असतांना महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यासाठी वेगळी स्वतंत्र वेतनश्रेणी देण्यात यावी.

(१९) शिक्षकांना अध्यापनाशिवाय इतर कामे सांगण्यात येवू नयेत.

(२०) जे शिक्षक शिष्यवृत्तीचा वर्ग चालवितात त्यांना प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी.

(२१) सभासदांचा सभेचा भत्ता वाढवून तो रु.५०/- करावा.

(२२) सभासदांना वाहनभत्ता मिळावा.

२) <u>शाळामंडळातील प्रशासनाधिकारी</u>

(१) शाळामंडळातील प्रशासनाधिकारी ३६ ते ४५ वयोगटातील आहेत.

(२) प्रशासनाधिकाऱ्यांना प्रशासनाधिकारी म्हणून ३ वर्षापेक्षा जास्त अनुभव आहे.

(३) प्रशासनाधिकाऱ्याला त्याच्या कार्याचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे.

(४) प्रशासन अधिकारी कलम नं.२५ व कलम नं.२६ नुसार मिळालेले अधिकार वापरत नाहीत.

(५) प्रशासन अधिकाऱ्याच्या आर्थिक अधिकाराची मर्यादा वाढवून द्यावी.

(६) शाळामंडळातील प्रशासक म्हणून काम करीत असलेल्या व्यक्तींचा वयोगट ३५ ते ५० हा आहे व प्रशासनाधिकारी म्हणून काम केलेल्यांच्या अनुभवाची कक्षा १ ते ६ वर्षांपर्यन्तची आहे.

(७) प्राथमिक शिक्षकांचे गोपनीय अहवाल लिहिण्याचे अधिकार प्रशासनाधिकाऱ्याला असावेत.

(८) चतुर्थवर्ग कर्मचारी नेमण्याचा अधिकार प्रशासनाधिकाऱ्याला द्यावा.

(९) अप्रशिक्षित शिक्षकाला प्रशिक्षणासाठी पाठविण्याचा अधिकार प्रशासनाधिकाऱ्याला असावा.

(१०) त्याला अधिक रकमेच्या निविदा मंजूर करण्याचा अधिकार द्यावा.

(११) प्रशासनाधिकाऱ्याला निरनिराळ्या प्रकारची कामे करावी लागतात. म्हणून त्याला प्रशिक्षण देण्यात यावे. या प्रशिक्षणात कार्यालयीन काम, बढती, नेमणूका, शिक्षणाचा कायदा इ० माहिती द्यावी.

(१२) प्रशासक म्हणून नेमण्यात येणाऱ्या व्यक्तीला आधीचा ५ ते ७ वर्षांचा सरकारी नोकरीचा अनुभव असला पाहिजे.

(१३) शाळांच्या संख्येच्या प्रमाणात प्रशासनाधिकाऱ्याच्या पगारात फरक असावा.

(१४) १० शाळांना एक प्रशासनाधिकारी असावा.

(१५) प्रशासनाधिकारी द्वितीयवर्ग अधिकारी मानण्यांत यावा, त्याचे नाव राजपत्रांत यावे.

(१६) लिव्ह रिझर्व्ह म्हणून १०:१ प्रमाणात शिक्षक नेमण्याचा अधिकार प्रशासनाधिका-याला असावा.

(१७) प्रशासनाधिका-याला वाहन भत्ता द्यावा.

३) शाळामंडळाचे सभापती

(१) शाळामंडळाच्या सभापतींचा वयोगट ४५ ते ५५ असा आहे.

(२) सभापती म्हणून काम करणा-यांची शैक्षणिक पात्रता चांगली आहे.

(३) सभापती शाळामंडळाचे काम पूर्णवेळ करीत नाहीत.

(४) सभापतींचे व्यवसाय निरनिराळे आहेत.

(५) सर्व सभासद सभापतींना सहकार्य करतात.

(६) सभापतींचे अधिकार वाढवावेत व शहरांतील प्राथमिक शिक्षण क्षेत्रात त्याला महत्वाचे स्थान मिळवून द्यावे.

४) नगरपालिका व शाळामंडळ

(१) शाळामंडळाला नगरपालिकेचे पुरेशा प्रमाणात सहकार्य मिळत नाही.

(२) नगरपालिकेतील शिक्षण समिती व शाळामंडळ यांच्या एकत्र बैठका होत नाहीत.

(३) नगरपालिका व शाळामंडळ यांचे अधिकार भिन्न आहेत.

(४) नगरपालिका व शाळामंडळ स्वतंत्रपणे कामकाज करतात.

(५) नगरपालिकांनी शाळेसाठी इमारती व क्रीडांगणे पुरवायची असतात.

(६) शाळामंडळाने सादर केलेल्या अंदाजपत्रकांत नगरपालिकेकडून होणारा फेरफार तांत्रिक स्वरूपाचा व मामुली असतो.

(७) नगरपालिकेचा शाळामंडळाशी संबंध येवू नये अशी कायदेशीर व्यवस्था करावी.

(८) शाळामंडळाच्या सभेत पास झालेल्या ठरावांची अंमलबजावणी करण्यासाठी नगरपालिकांची संमती लागत नाही.

(९) शाळेच्या इमारतींची दुरुस्ती वेळेवर करण्यात यावी म्हणून कांही व्यवस्था करणे आवश्यक आहे.

(१०) नगरपालिकांनी शाळामंडळाला सहकार्य दिले पाहिजे असे नगर-पालीकांवर कायदेशीर बंधन टाकावे.

(११) नगरपालिकेने शाळेसाठी इमारती बांधून द्याव्यात अशी कायदेशीर तरतूद करण्यात यावी.

(१२) शाळेसाठी इमारती भाड्याने घेण्याची पध्दती बंद करावी व त्याबाबतची सर्व जबाबदारी नगरपालिकांवर टाकावी.

(१३) भाड्याने घेतलेल्या शाळेच्या इमारतींची दुरुस्ती करण्याचा अधिकार नगरपालिकेस द्यावा.

(१४) नगरपालिका गोळा करीत असलेल्या शिक्षणकराची रक्कम शाळामंडळाला मिळावी. त्यानंतर शिक्षणकरातील कांही भाग काही काळ शाळामंडळाला मिळावा. दर १० वर्षांनी

एकदा सर्व शिक्षणकर शाळामंडळाला द्यावा. अशा प्रकारे उपलब्ध झालेल्या पैशातून शाळामंडळाने इमारती व क्रीडांगणांचा प्रश्न सोडवावा.

(१५) नगरपालिकेने डेडस्टॉक ठेवण्यासाठी स्वतंत्र गोडाऊन्स बांधावीत.

(१६) प्राथमिक शिक्षणातील नगरपालिकांचा आर्थिक वाटा वाढविण्यात यावा.

(१७) शिक्षक दिन, क्रीडा महोत्सव, आंतरशालेय स्पर्धा, शैक्षणिक शिबिरे, कृतिसत्रे, इत्यादींवर मान्य दराने अनुदान मिळावे.

(१८) मुलांना शाळेत येण्यास प्रवृत्त करण्यासाठी निरनिराळ्या योजना नगरपालिकेने तयार कराव्यात.

(१९) नगरपालिकेने शाळामंडळाचे अंदाजपत्रक मंजूर करून त्याप्रमाणे शाळामंडळाला रक्कम द्यावी. त्याचा हिशोब शाळामंडळात ठेवावा व तो नगरपालिकेला सादर करावा. या हिशोबाची शासकीय तपासणी नगरपालिकेच्या हिशोब तपासणीबरोबर करावी. असे करण्याने शाळामंडळ नगरपालिकेस जबाबदार राहील व नगरपालिकेवर अंतीम सर्वांची जबाबदारी राहील.

(२०) शाळांच्या इमारतीसाठी वॉचमन नेमावा.

(२१) नव्याने घरे बांधणाऱ्या गृहनिर्माण संस्थांवर त्यांच्या प्लॉटमध्ये शाळेसाठी इमारत बांधण्याची सक्ती करावी व बांधलेल्या इमारतीची देखभाल नगरपालिकेने करावी.

(२२) घरबांधणीसाठी नव्याने परवाने देतांना परवाना फीमध्ये वाढ करावी व तो पैसा शाळांच्या इमारतीसाठी वापरावा.

५) सरकार व शाळामंडळ

(१) शाळामंडळाला सरकारचे सहकार्य असते व सरकार शाळामंडळाला आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करते.

(२) शाळामंडळ व सरकार यांच्यामध्ये प्रत्यक्ष चर्चा घडवून आणण्याची व्यवस्था असणे आवश्यक आहे.

(३) सरकारने खात्याच्या परीक्षा सुरु कराव्यात.

(४) शाळामंडळातील लोकप्रतिनिधी व शासकीय कर्मचारीवर्ग यांच्यात चांगले सहकार्य असते.

(५) शाळामंडळाच्या कार्यालयात आवश्यक असलेली सामुग्री सरकारने पुरवावी.

(६) प्राथमिक शिक्षणाच्या कायद्याला (१९४७) अनुलक्षून केलेली प्राथमिक शिक्षण नियमावलीची मराठी प्रत पुरवावी.

(७) शाळामंडळात पास झालेल्या काही ठरावांची अंमलबजावणी करण्यासाठी सरकारची परवानगी लागते.

(८) अनुदानास मान्य होणाऱ्या खर्चाची यादी वाढवावी.

(९) कर्मचारीवर्गास प्रशिक्षण द्यावे. प्रशिक्षण वर्गात ऑफिस प्रोसिजर, हिशोब व शिक्षणाच्या कायद्याची माहिती द्यावी.

(१०) प्राथमिक शाळेतील मागासवर्गीय व दुर्बल घटकांची सोय करण्यासाठी प्रतिवर्षी प्रति विद्यार्थ्यांमागे रु.२०/- द्यावेत.

(११) मान.शिक्षणसंचालकांच्या मान्यतेने कर्मचारी भरण्याची परवानगी असावी.

(१२) नगरपालिकांच्या प्राथमिक शाळा व खाजगी प्राथमिक शाळा असा भेदभाव न करता वेतनेतर खर्चाच्या मान्य बाबीत एकसूत्री-पणा आणावा.

(१३) खाजगी शाळांना परवानगी देण्यापेक्षा नगरपालिकांच्या शाळा वाढविण्याचे धोरण सरकारने ठेवावे.

(१४) पर्यवेक्षक नेमतांना शाळांची संख्या विचारात घ्यावी.

(१५) सरकारने निर्णय घेण्यासाठी कालमर्यादा निश्चित करावी.

(१६) १९४७ चा प्राथमिक शिक्षणाचा कायदा रद्द करावा. नवीन कायद्यान्वये शाळामंडळाला आर्थिक स्वातंत्र्य द्यावे.

(१७) शिक्षकांना अध्यापनाव्यतिरिक्त इतर कामे देऊ नयेत. इतर कामे अन्यत्र रोजगारी लावून करून घ्यावीत.

(१८) शिक्षकांना घरे बांधण्यासाठी कमी व्याजाच्या दराने कर्ज मिळण्याची व्यवस्था करावी.

(१९) इयत्ता ५ वी ते ७ वीच्या वर्गांना बाक पुरवावेत.

(२०) प्राथमिक शिक्षण कायद्याच्या व नियमांच्या मराठी प्रती उपलब्ध व्हाव्यात.

(२१) नगरपालिका शाळेतील व खाजगी मान्य शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर सेवकांना गृहविमा योजना लागू करावी.

(२२) संघटनांच्या अधिवेशनास उपस्थित राहण्याचा खर्च अनुदानपात्र समजण्यात यावा.

(२३) शाळामंडळाच्या सभासदांचे भत्ते वाढवावेत.

(२४) शाळामंडळाच्या सभापतींना वाहनभत्ता मिळावा किंवा त्याच्या वाहनाची सोय करावी.

(२५) संगीत शिक्षक व शारीरिक शिक्षक नेमावेत.

(२६) मूक-बधीर, अंध इ. अपंगांसाठी शाळा काढण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी सर्वतोपरी मदत व्हावी.

(२७) खाजगी मान्य शाळेत असते तशी परिस्थिती (मुलांना बसायला बाक, विषयवार शिक्षक, मुख्याध्यापक स्वतंत्र इ.) नगरपालिकांच्या शाळांमध्ये असावी.

(२८) शिक्षकांची भरती करण्यासाठी निर्माण करण्यात आलेले विभागीय मंडळ रद्द करावे.

(२९) प्राथमिक शिक्षणाचा नवा कायदा करतांना शाळामंडळांना आर्थिक बाबींची संपूर्ण स्वायत्तता मिळेल असा करावा.

(३०) सरकारने वेळोवेळी निघणारे गॅझेट शाळामंडळाला ताबडतोब पाठवावेत.

(३१) पश्चिम महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण महामंडळाच्या कार्यकारिणीच्या सभांना उपस्थित राहण्यासाठी केलेला प्रवासखर्च अनुदानासाठी पात्र समजण्यात यावा.

(३२) विविध शैक्षणिक कार्यक्रमांसाठी केलेल्या खर्चावर अनुदान मिळावे.

(३३) प्राथमिक शिक्षण कायदा (१९४७) व त्याला अनुसरून केलेली

नियमावली (१९४९) यांच्या मराठी प्रती तातडतीने उपलब्ध करून द्याव्यात.

(२४) प्राथमिक शिक्षण कायद्यांत सभासदांची कामे व अधिकार यांची नोंद करण्यात यावी.

(२५) शाळामंडळाच्या सभासदाने शाळेला भेट दिल्यानंतर दिलेल्या शे-यावर कृती केली जावी.

६.ब) शिफारशी

१) शाळामंडळ

(१) शाळामंडळात पाठविण्यात येणा-या प्रतिनिधींची संख्या पुरेशी आहे.

(२) शाळामंडळात पाठविण्यात येणा-या प्रतिनिधींसाठी जी निवडणूक पद्धती आज अंमलात आणली जाते तीच चालू ठेवावी.

(३) शाळामंडळात निवडून येणा-या प्रतिनिधींची वयोमर्यादा सध्या आहे तीच कायम ठेवावी.

(४) शाळामंडळात निवडून येणा-या सभासदांच्या शैक्षणिक पात्रतेत वाढ करावी. शिक्षणविषयक पदवी असण्याची अट घालावी.

(५) शाळामंडळातील एकूण सभासदांत एक सभासद शास्त्र पदवीधर असावा.

(६) शाळामंडळात होणाऱ्या सभांची कार्यसूची प्रशासनाधिकारी व सभापती ठरवितात हीच पध्दत चालू ठेवावी.

(७) शाळामंडळात इंजिनिअरींग खाते काढावे व त्याकडून शाळेतील अंतर्गत खते, पाणी, वीज व्यवस्था, दुरुस्ती इ.कामे करून घ्यावीत.

(८) शाळामंडळातील कार्यालयीन कर्मचारीवर्गास प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करावी.

(९) शहरातील शाळांची संख्या २००० झाली की, शाळामंडळात एक लेखापाल व दोन लिपिक नेमावेत.

(१०) शाळामंडळाच्या सभापतीचे अधिकार वाढविण्यात यावेत.

(११) शाळामंडळाच्या सभासदांचा भत्ता वाढवून मिळावा.

(१२) शाळामंडळाच्या सभासदांना वाहनभत्ता चालू करावा.

२) <u>प्रशासनाधिकारी</u>

(१) प्रशासन अधिकाऱ्याला प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात यावी व त्याचे प्रशासकीय व आर्थिक अधिकार वाढवावेत.

(२) 'दि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन अॅक्ट १९४७' मधील कलम ३५ ची अंमलबजावणी करण्यास प्रशासकास भाग पाडावे.

(३) शिक्षकांचे गोपनीय अहवाल प्रशासनाधिकाऱ्यांनी लिहावेत.

(४) अप्रशिक्षित शिक्षकाला प्रशिक्षणाला पाठविण्याचा अधिकार प्रशासनाधिकाऱ्याला असावा.

(५) शाळामंडळाकडे ज्या प्रमाणात शाळा असतील त्या प्रमाणात प्रशासनाधिकाऱ्याच्या वेतनात फरक करावा.

(६) प्रशासनाधिकाऱ्याला द्वितीयश्रेणीचे अधिकारी समजण्यात यावे व त्याचे नांव राजपत्रात यावे.

(७) लिव्ह-रिझार्व्ह शिक्षक म्हणून १०:१ प्रमाणे शिक्षक नेमण्याचा अधिकार प्रशासनाधिकाऱ्याला असावा.

२) नगरपालिका व शाळामंडळ

(१) प्राथमिक शाळांसाठी इमारती बांधण्याचे बंधन नगरपालिकांवर टाकावे. भाड्याच्या इमारती घेण्याची प्रथा बंद करण्यात यावी.

(२) भाड्याने घेतलेल्या इमारतींची दुरुस्ती व देखभाल करण्याचे अधिकार नगरपालिकेस असावेत.

(३) नगरपालिकांचा व शाळामंडळाचा आर्थिक क्षेत्रात संबंध येणार नाही अशी कायदेशीर तरतूद व्हावी.

(४) शहरात जमा होणारा शिक्षण कर सुरवातीच्या काही वर्षांसाठी शाळामंडळांना द्यावा. त्यानंतर करातील काही टक्के रक्कम शाळामंडळास द्यावी व दर १० वर्षांनी सर्व शिक्षण कर शाळामंडळाला मिळावा. याप्रमाणे उपलब्ध झालेल्या पैशातून शाळामंडळाने आपल्या सर्व आर्थिक गरजा भागवाव्यात.

(५) मुलांना शाळेत येण्यास प्रवृत्त करण्यासाठी निरनिराळ्या योजना राबविण्यासाठीची जबाबदारी नगरपालिकेने स्वीकारावी.

४) शासन व शाळामंडळ

(१) प्रशासन अधिका-यासाठी खाते परीक्षा सुरु कराव्यात.

(२) 'दि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट १९४७' ला अनुसरुन केलेल्या नियमावलीतील संदिग्धता दूर करण्यात यावी.

(३) अनुदानपात्र खर्चाची यादी नव्याने करण्यात यावी.

(४) शाळेतील शिक्षकांची संख्या ठरविताना मुख्याध्यापक वगळून ठरविली जावी.

(५) खात्यात काम करीत असतांना महाविद्यालयीन परीक्षा पास होणा-या शिक्षकांना स्वतंत्र वेतनश्रेणी द्यावी.

(६) शिक्षकांना अध्यापनाखेरीज इतर कामे सांगू नयेत.

(७) मागासवर्गीय व दुर्बल घटकांतील मुलांची सोय करण्यासाठी प्रती विद्यार्थ्यांमागे प्रतिवर्षी रु.२०1- देण्यात यावेत.

(८) नगरपालिकांच्या शाळा व खाजगी मान्य शाळा असा भेदभाव न ठेवता वेतनेतर खर्चाच्या मान्य बाबीत एकसूत्रीपणा असावा.

(९) खाजगी शाळांना परवानगी देण्याऐवजी नगरपालिकांच्या शाळा वाढविण्याचे धोरण स्वीकारावे.

(१०) सादिलवार खर्चासाठी शाळेतील शिक्षकांच्या एकूण वेतनाच्या ५ टक्के रक्कम शाळेला द्यावी.

(११) पर्यवेक्षक नेमतांना शाळांची संख्या विचारात घ्यावी.

(१२) 'दि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट १९४७' चा कायदा रद्द करण्यात यावा.

(१३) संगीत शिक्षक व शारीरिक शिक्षणासाठी शिक्षक नेमण्यात यावेत.

(१४) अपंगांसाठी शाळा काढाव्यात.

(१५) 'प्राथमिक शिक्षण नियम(१९४९)' मध्ये शाळामंडळाच्या सभासदांची कामे व अधिकार यांची नोंद नाही ती करण्यात यावी.

(१६) 'दि बॉम्बे प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट १९४७' व 'प्राथमिक शिक्षण नियम (१९४९)' च्या मराठी प्रती उपलब्ध करून द्याव्यात.

६.क) <u>पुढील संशोधनासाठी सूचना</u> :

पुढील संशोधनासाठी कांही सूचना सुचविण्यात आलेल्या आहेत, त्या खालीलप्रमाणे आहेत.-

१) संशोधकाने आपल्या संशोधनाचे कार्यक्षेत्र एका जिल्ह्यापुरते मर्यादित ठेवलेले आहे. यापुढील संशोधकाने संशोधनासाठी संशोधनाचे कार्यक्षेत्र वाढवून हाच अभ्यास करणे फायदेशीर ठरेल.

२) शाळामंडळ स्वायत्त होण्याच्या दृष्टीने काही उपाय सुचविणे.

३) नगरपालिकांतील शिक्षण समितीच्या कार्याचा अभ्यास करून तिच्या कार्याचे मूल्यमापन करणे.

४) नगरपालिकेच्या शाळांच्या इमारतींचा व क्रीडांगणांचा अभ्यास करून शिफारशी करणे.

५) शाळामंडळाच्या प्रशासनाधिकाऱ्यासाठी प्रशिक्षणाचा कार्यक्रम तयार करणे.

या प्रकरणात निष्कर्ष एकत्र केलेले आहेत. त्याचप्रमाणे कांही शिफारशी केलेल्या आहेत. त्यांची अंमलबजावणी केली तर शहरातील प्राथमिक शिक्षणाला योग्य ती गती प्राप्त होईल असे वाटते. त्याच-बरोबरच पुढील संशोधनासाठी काही सूचनाही केलेल्या आहेत. या सर्वांची नोंद घेतली तर संशोधकाचे काम सार्थकी लागेल असे वाटते.

# संदर्भ ग्रंथ सूचि

## पुस्तके


१. घाटोळे, रा.ना., समाजशास्त्रीय संशोधन तत्व आणि पध्दती, नागपूर, श्री.मंगेश प्रकाशन, १९८५.

२. बढे, जी.एस्., भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था - उद्गम आणि विकास, मुंबई, हिमालय पब्लिशिंग हाऊस, १९७८(

३. भांडारकर, पु. ल., सामाजिक संशोधन पध्दती, नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, १९८७.

४. मुळे, रा.शं., उमाठे, वि.तु., शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, नागपूर, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, १९८७.

५. जोशी, ग.ब., महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक प्रशासन, पुणे, ज्योती प्रकाशन, १९६१.

६. वर्तक, रजनी महादेव, महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक प्रशासन आणि जिल्हा परिषदा, पुणे, लोकसंग्रह मुद्रणालय, १९७५.

७. शिक्षण संचालक, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्रातील शिक्षणाच्या पुनर्रचनेसंबंधीचे धोरणविषयक निवेदन, मुंबई, मध्यवर्ती शासकीय मुद्रणालय, १९७०.

८. संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, १९८६, शैक्षणिक आव्हानाकडून कृती कार्यक्रमाकडे, पुणे, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, १९८७.

नियतकालिके

१. पश्चिम महाराष्ट्र नगरपालिका शिक्षण महामंडळ, स्मरणिका, भिवंडी, विशाल प्रिंटर्स, १९८४.

२. चेअरमन, रौप्य महोत्सव समिती, नगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळ, बारस, बार्शी, १९८१.

३. तांबोळी, अ.अ., पोरे, स.का., 'अहवाल लेखन' शिक्षण समीक्षा, (एप्रिल-मे, १९८८).

नियम

१. संचालक, शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई प्राथमिक शिक्षण नियम १९४९, मुंबई, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, १९८४.

अहवाल

१. महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण सुधार समितीच्या शिफारशी, मुंबई ३२, शिक्षण व सेवायोजन विभाग, मंत्रालय विस्तार भवन, १९८४.

English Books

1. Aggrawal, J.C., Educational Research - An Introduction, New Delhi, Arya Book Depot, 1966.

2. Awasthi, A.A., (Ed.) Municipal Administration in India, Agra, Laxminarayan Aggarwal, 1972.

3. Best, John, W., Research in Education, New Delhi, Printice Hall of India Pvt.Ltd., 1982.

4. Buch, M. B., A Survey of Research in Education, Baroda, Centre of Advanced Study in Education, Faculty of Education and Psychology, M.S.University of Baroda, 1974.

5

5. Buch, M.B., Second Survey of Research in Education, Baroda, Society for Educational Research and Development, 1979.

6. Chaudhari, P.H., The Maharashtra Municipalities Act, 1965 (Mah.Act No.XL 1965), Poona, N.R.Bhalerao, Law Book Sellers and Publishers, 1966.

7. Director of Education, Government of Bombay, A Review of Education in Bombay State 1855-1955, Poona, Government Central Printing Press, 1956.

8. Inamdar, N.R., Educational Administration in Zillah Parishads in Maharashtra - A Pilot Study, Bombay, Popular Prakashan, 1974.

9. Mukherjee, S.N., (Ed) Administration of Education in in India, Baroda, Acharya Book Depot, 1962.

10. Mukherjee, S.N., Education in India Today and Tomorrow, Baroda, Acharya Book Depot, 1960.

11. Naik, J.P., Elementary Education in India - The Unfinished Business, Bombay, Asia Publishing House, 1966.

12. Patwardhan, C.N., An Introduction to the Study of Educational Administration in India, Pune, Arya Sanskriti Mudranalay.

13. Syed Nurullah, and Naik, J.P., A Student's History of Education in India, Bombay, Machmillan, 1964.

14. Thigale, S.M., Paranjpe, S.A., Educational Problems ad and Administration in the Bombay State, Ahmednagar, Suhas Prakashan, 1956.

Act

Government of Maharashtra, The Primary Education Act, 1947, Bombay, Government Central Press, 1960.

## परिशिष्ट - १.

### प्रश्नावली भरून देण्यासाठी संशोधकाने केलेले विनंतीपत्र

प्रा. सौ. विजया के. देशपांडे,
शिक्षण महाविद्यालय, बार्शी,
जिल्हा-सोलापूर. पिन-४१३ ४११.

स. न. वि. वि.

सोबत एक प्रश्नावली दिली आहे, ती भरून द्यावी ही नम्र विनंती या पत्रद्वारे आपणास करीत आहे.

शहरातील प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी नगरपालिकांवर सोपविण्यात आली असून ती स्कूल बोर्डाच्या मदतीने पार पाडली जाते. या संदर्भात नगरपालिका, राज्य सरकार व स्कूल बोर्ड या तीन संस्थांचा संबंध येतो. या संबंधाचा अभ्यास करणे जरुरीचे वाटल्यावरून मी या विषयावर संशोधन करीत आहे. या कार्यात डॉ. प्राचार्य सी. डी. शितोळे, शिक्षण महाविद्यालय, बार्शी हे मार्गदर्शक आहेत.

आपण दिलेली माहिती संशोधन कार्याव्यतिरिक्त अन्यत्र कोणत्याही ठिकाणी वापरली जाणार नाही व ती गुप्त ठेवण्यात येईल असे आश्वासन मी आपणास देते.

आपले सहकार्य मिळेल असा विश्वास बाळगते, कळावे.

बार्शी, )
दि. )

आपली विश्वासू,

(सौ. वि. के. देशपांडे)

## परिशिष्ट - १

### नगरपालिकेच्या शाळामंडळाच्या प्रशासनाधिकाऱ्यांकरिता

### प्रश्नावली

विषय:- नगरपालिकेतील शाळामंडळाच्या संदर्भात 'दि प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट (१९४७)' चा अभ्यास करणे.

सूचना :- (१) प्रश्नाचे उत्तर कोणत्या स्वरुपात अपेक्षिले आहे याविषयीची कल्पना प्रश्न संपल्यानंतर दिलेल्या सूचनेत दिली आहे.

(२) होय/नाही या प्रकारच्या प्रतिसादास आपणास जो प्रतिसाद द्यावयाचा आहे त्यावर ✓ अशी खूण करा.

वैयक्तिक माहिती

(१) नांव ................................... (२) वय ....वर्षे

(३) अनुभव (प्रशासनाधिकारी म्हणून)

(४) शैक्षणिक माहिती.

(५) शाळामंडळात येणेपूर्वी आपण कोणत्या पदावर काम करीत होतात ?

(६) प्रशासनाधिकाऱ्याचे काम स्वीकारण्यापूर्वी त्याबद्दलचे प्रशिक्षण आपणास मिळाले होते काय ? (होय/नाही)

(७) प्रशासनाधिकारी म्हणून काम करण्यापूर्वी प्रशिक्षणाची आवश्यकता आहे आपणास वाटते काय ? (होय/नाही)

आपले उत्तर होकारार्थी असेल तर "प्रशिक्षणाची आवश्यकता आहे" असे वाटायला लागणाऱ्या एखाद्या प्रसंगाची नोंद करा.

शाळामंडळाचे कार्यालय
-----------------

(१) आपल्या कचेरीत विभाग किती आहेत ?

(२) आपल्या कचेरीत एकूण किती कर्मचारी आहेत ?

(३) कर्मचाऱ्यांची संख्या पुरेशी आहे काय ? (होय/नाही)

आपले उत्तर नकारार्थी असल्यास -

(अ) आणखी किती कर्मचारी पाहिजेत ?

(ब) कोणकोणत्या श्रेणीमध्ये कर्मचारी पाहिजेत ?

(क) कर्मचारी न भरण्याचे कारण कोणते ? (योग्य पर्यायापुढे ✓ अशी खूण करा.)

- मागणी करूनहि मंजुरी मिळाली नाही.
- मागणी केली नाही.
- योग्य व्यक्ती मिळाली नाही.

(४) प्रशासनाचे काम कार्यक्षमतेने करता यावे म्हणून आवश्यक असणारी सर्व परिस्थिती आपल्याकडे आहे काय ? (होय/नाही)

आपले उत्तर नकारार्थी असेल तर त्याची कारणे कोणती ? (योग्य पर्यायापुढे ✓ अशी खूण करा.)

(अ) पुरेशा इमारती नाहीत.

(ब) इमारती असून त्या व्यवस्थित नाहीत.

(क) पुरेशी क्रीडांगणे नाहीत.

(ड) शैक्षणिक साधने नाहीत.

(इ) पालकांचे सहकार्य नाही.

(ई) नगरपालिकाचे सहकार्य नाही.

(फ) शाळामंडळातील सदस्यांचा दबाव येतो.

(ग) पर्यवेक्षण करणे जमत नाही.

(ह) राज्य सरकार उदासीन आहे.

(च)

(छ)

(ज)

शाळा-मंडळ :

(१) शाळा-मंडळात सभासद किती आहेत ?

(२) शाळामंडळातील सभासदांची संख्या पुरेशी आहे काय ? (होय/नाही)

आपले उत्तर होकारार्थी नसेल तर सभासदांची संख्या किती असावी असे आपणास वाटते ?

(३) शाळा-मंडळातील सरकारी सभासदांची संख्या वाढवावी काय ? (होय/नाही)

(४) शाळा-मंडळातील सरकारी सभासदांचा कोणता फायदा मिळतो ? (योग्य पर्यायापुढे √ अशी खूण करा.)

(अ) एखादी योजना वरून मंजूर करून आणण्यास मदत होते.

(ब) योजना निर्दोष बनविण्यास मदत होते.

(क) कायद्याचा अर्थ व संकेत समजण्यास मदत होते.

(ड) प्रशासनाच्या परंपरा समजण्यास मदत होते.

(इ) शाळामंडळातील चर्चा अर्थपूर्ण करण्यास मदत होते.

(ई) शासकीय धोरण कळण्यास मदत होते.

(फ)

(ग)

(५) शाळामंडळात शिक्षकांचा प्रतिनिधी असावा काय ? (होय/नाही)

(६) शाळामंडळात सभासद ज्या पध्दतीने येतात ती पध्दत समाधानकारक आहे काय ? (होय/नाही)

आपले उत्तर नकारार्थी असल्यास काही सुधारणा सुचवा.

(७) शाळामंडळ व नगरपालिकेतील शिक्षण समिती यांच्या एकत्र बैठकीचे प्रसंग वर्षातून किती येतात ?

अशा बैठकीतून घेण्यात आलेल्या निर्णयांपैकी २ महत्वाचे निर्णय सांगा.

नगरपालिका व शाळामंडळ

(१) नगरपालिकेतील शिक्षण समितीला व शाळा-मंडळाला सारखेच अधिकार दिले गेले आहेत असे आपणास वाटते काय ? (होय/नाही)

आपले उत्तर होकारार्थी असेल तर कोणते अधिकार दोघांना सारखेच दिले गेले आहेत ?

(अ)

(ब)

(क)

अशा परिस्थितीत आपण कोणती भूमिका घेता ? (योग्य पर्यायासमोर ✓ अशी खूण करा)

(अ) अलिप्त राहतो.

(ब) स्वतःचे अधिकार वापरतो.

(क) शिक्षण समितीचा निर्णय मानतो.

(ड) राज्य सरकारकडून मार्गदर्शन मिळवितो.

(इ)

(ई)

(२) शहरातील प्राथमिक शिक्षणाची सर्व जबाबदारी शाळामंडळावर सोपविलेली असता नगरपालिकेत शिक्षण समिती असणे अयोग्य आहे असे आपणास वाटते काय ? (होय, नाही)

(३) शाळा-मंडळाचे प्रशासक म्हणून नगरपालिकेच्या शिक्षण समिती-बरोबर चर्चा करण्याचे प्रसंग किती वेळा येतात ? (योग्य पर्यायापुढे ✓ अशी खूण करा.)

(अ) कधीच नाही.

(ब) वरचेवर

(क) मधून मधून.

(४) नगरपालिकेच्या अध्यक्षांचे नियंत्रण शाळामंडळाच्या कारभारावर किती असते ? (योग्य पर्यायापुढे ✓ अशी खूण करा).

(अ) बरेचसे असते.

(ब) मुळीच नसते.

(क) फारच थोडे असते.

(५) शाळा-मंडळाने तयार केलेले वार्षिक अंदाजपत्रक नगरपालिकेकडे सादर केले जाते. अशा वेळी कांही दुरुस्ती सुचविली जाते, ती दुरुस्ती कशी असते ?

(मामुली स्वरुपाची । मोठ्या स्वरुपाची)

(६) अंदाजपत्रकांत नगरपालिका दुरुस्ती कां सुचविते ? (योग्य पर्यायापुढे '✓ अशी खूण करा)

(अ) नगरपालिका शाळामंडळांला दुय्यम संस्था समजते.

(ब) तांत्रिक कारणामुळे.

(क) शाळा-मंडळाच्या योजना व्यवहार्य नसल्यामुळे.

(ड) पैसा उपलब्ध नसतो म्हणून.

(ई) नगरपालिकेत अधिक तज्ञ लोकांचा सल्ला मिळतो.

(फ)

(७) नगरपालिकेच्या शिक्षण समितीकडून आपणास काही प्रशासकीय स्वरुपाच्या सूचना येतात काय? (होय/नाही)

(८) शाळामंडळाने सुचविलेली एखादी योजना नगरपालिकेच्या शिक्षण समितीने डावलली आहे काय?

(९) नगरपालिकेतील शिक्षण समितीत तुमचा सल्ला विचारला जातो काय?

(१०) शाळा-मंडळाच्या बैठकीला नगरपालिकेच्या शिक्षण समितीचा सभासद उपस्थित असतो काय ? (होय/नाही)

आपले उत्तर होकारार्थी असल्यास तो कोणत्या अधिकारात उपस्थित असतो ? (योग्य पर्यायापुढे ✓ अशी खूण करा.)

(अ) आमंत्रित म्हणून. (ब) नागरिक म्हणून.

(११) प्राथमिक शाळांसाठी लागणाऱ्या इमारती व क्रीडांगणे पुरेशी असत नाहीत याचे कारण कोणते ?

(१२) शाळामंडळाच्या इमारतींची दुरुस्ती, देखभाल करण्याबद्दल निर्णय कोण घेते ? (योग्य पर्यायासमोर ✓ अशी खूण करा.)

(अ) नगरपालिकेतील स्थापत्य विभाग.

(ब) शाळा-मंडळाचा प्रशासक.

(क) नगराध्यक्ष.

(ड) नगरपालिकेतील शिक्षण समिती.

(१३) नगरपालिकेशी कोणत्याही प्रकारचा संबंध राहणार नाही अशा प्रकारची कायदेशीर व्यवस्था असावी काय? (होय/नाही).

राज्य सरकार व शाळामंडळ :

(१) शाळामंडळावर राज्य सरकारचे संपूर्ण नियंत्रण असते असे आपणास वाटते काय ? (होय/नाही)

(२) एखादी नवी योजना आखतांना व ती पार पाडतांना राज्य सरकार कोणत्या प्रकारची मदत देते ?

(३) राज्य सरकारतर्फे संशोधन, सर्व्हेक्षण, शैक्षणिक पहाणी अशी काही कामे केली जातात काय ? (होय/नाही)

(अ) कोणती कामे केली आहेत ?

(४) राज्य सरकारकडे जे अधिकार आहेत त्यामुळे शाळामंडळाच्या कामावर परिणाम होतो काय ? (होय,नाही)

याबाबत एखादे उदाहरण द्या.

(५) राज्य सरकारचे अधिकारी व शाळा-मंडळाचे प्रशासनाधिकारी यांची एकत्र चर्चा झाली आहे काय ? (होय,नाही)

(६) अशा सभा होत असल्यास वर्षात साधारणपणे किती होतात ?

(७) प्रा.शि.कायदा (१९४७) मध्ये कोणत्या ठिकाणी भाषेची संदिग्धता वाटते ? उदाहरण लिहा.

इतर :

(१) सक्तीच्या वयोगटातील मुलांना शाळेत न पाठविल्याबद्दल पालकांना दंड केला आहे काय ? (होय,नाही)

(२) सक्तीच्या वयोगटातील मुलांना नोकरीस लावले म्हणून मालकांना दंड केला आहे काय? (होय,नाही)

(३) शाळामंडळाच्या सभासदांचे वय कमी असावे काय ? (होय,नाही) आपले उत्तर होकारार्थी असेल तर वय किती असावे असे वाटते ?

(४) शाळामंडळात निवडून येणाऱ्या सभासदांसाठी कोणती अधिक पात्रता असावी असे आपणास वाटते?

(५) प्रशासक म्हणून कोणत्या अडचणी जाणवतात?

## परिशिष्ट - २

### नगरपालिकेच्या शाळा-मंडळाच्या समापतींसाठी प्रश्नावली

विषय:- नगरपालिकेतील शाळामंडळाच्या संदर्भात, 'दि प्रायमरी एज्युकेशन ॲक्ट (१९४७)' चा अभ्यास करणे.

सूचना :- (१) प्रश्नाचे उत्तर कोणत्या स्वरूपात अपेक्षिले आहे, याविषयीची कल्पना प्रश्न संपल्यावर दिलेल्या सूचनेत दिली आहे.

(२) होय, नाही या प्रकारच्या प्रतिसादास आपणास जो प्रतिसाद द्यावयाचा आहे त्यावर ✓ अशी खूण करा.

वैयक्तिक माहिती

(१) नांव .................................. (२) वय ....वर्षे

(३) व्यवसाय ..............................

(४) शैक्षणिक माहिती ..................................

(५) शाळामंडळाचे समापती होण्याच्या आधी अन्यत्र स्वीकारलेल्या जबाबदाऱ्या :-

(अ) शिक्षण विषयक-

(ब) इतर -

शाळा-मंडळ

(१) शाळा-मंडळाच्या सभा वर्षातून किती होतात ?

(२) शाळा-मंडळाच्या सभेचा अजेंडा कोण ठरविते ?

(योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा.)

(अ) शाळा-मंडळाचा सभापती

(ब) शाळा-मंडळाचा प्रशासनाधिकारी

(क) नगरपालिकेचा अध्यक्ष

(ड) नगरपालिकेचा मुख्याधिकारी

(इ) शाळा-मंडळाचा सभापती व प्रशासनाधिकारी

(ई) इतर.

(३) शाळामंडळाने शैक्षणिक उद्दिष्ट साध्य व्हावे म्हणून शाळा-मंडळातील इतर सभासदांची मदत किती प्रमाणात होते ?
(योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा.)

(अ) बरीचशी

(ब) पुरेशी

(क) अल्पशी.

आपले उत्तर जर 'अल्पशी' असे असेल तर त्याची कारणे कोणती असावीत ? (त्यापुढे ✓ अशी खूण करा.)

(अ) प्रश्नांची जाण कमी असते.

(ब) कार्यालयाकडून पुरेशी माहिती मिळत नाही.

(क) कार्यालयाकडून माहिती उपलब्ध करून दिली तरी सभासद त्याचा उपयोग करून घेत नाहीत.

(ड) वैयक्तिक प्रश्नांकडे लक्ष देतात.

(इ) माहिती मिळवायला वेळ कमी मिळतो.

(ई) कायदेशीर ज्ञान पुरेसे नसते.

(फ) इतर.

(४) शाळामंडळाच्या प्रशासकीय यंत्रणेत कोणती उणीव जाणवते ?
(योग्य उत्तरापुढे ✓ अशी खूण करा.)

(अ) नोकरवर्ग प्रशिक्षित नसणे.

(ब) कार्यालयात योग्य माहिती उपलब्ध नसणे.

(क) पुरेसे अधिकार नाहीत.

(ड) नोकरवर्ग पुरेसा नाही.

(इ) मार्गदर्शन मिळत नाही.

(ई) कायदा व नियमावली सविस्तर नाही.

(फ) गतीशील सहकार्य मिळत नाही.

(ग) इतर.

सभापती म्हणून :

(१) शाळामंडळाचे सभापती म्हणून आपण शाळामंडळाचे काम किती वेळ करता ? (योग्य उत्तरापुढे ✓ अशी खूण करा.)

(अ) पूर्ण वेळ.

(ब) अर्ध वेळ.

(क) आवश्यकतेनुसार लागेल तेवढा वेळ.

(२) शाळा-मंडळात संमत झालेल्या ठरावांची अंमलबजावणी सभापती म्हणून आपणास करता येते काय? होय/नाही.
आपले उत्तर होकारार्थी असेल तर योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा.

(अ) पास झालेल्या सर्व ठरावांची अंमलबजावणी करता येते.

(ब) पास झालेल्या कांही ठरावांची अंमलबजावणी करता येते.

(क) काही ठरावांची अंमलबजावणी करण्यासाठी वरून संमती मिळवावी लागते.

(३) शाळामंडळात पास झालेल्या काही ठरावांची अंमलबजावणी करता येत नसेल तर त्यांची अंमलबजावणी व्हावी म्हणून कोणाची संमती लागते ? (योग्य उत्तरापुढे ✓ अशी खूण करा.)

(अ) शासन.

(ब) नगरपालिका.

(क)

(४) शाळामंडळाचे सभापती म्हणून काम करतांना सर्वसामान्य आणि विशेष समस्या कोणत्या आढळल्या ?

| सर्वसाधारण समस्या | विशेष समस्या |
| --- | --- |
| (१) ...................... | (१) ...................... |
| (२) ...................... | (२) ...................... |
| (३) ...................... | (३) ...................... |
| (४) ...................... | (४) ...................... |

(५) शाळामंडळाचे सभापती म्हणून आपले विशेष स्थान व अधिकार कोणते ?

..........................................

..........................................

..........................................

..........................................

## शाळामंडळ व नगरपालिका :

(१) शाळामंडळ व नगरपालिकेतील शिक्षण समिती कोणकोणत्या प्रसंगी एकत्र येऊन चर्चा करतात ? (योग्य उत्तरापुढे ✓ अशी खूण करा).

(अ) प्राथमिक शिक्षणाची सक्तीची योजना ठरवितांना.

(ब) खाजगी शाळांना द्यावयाचे अनुदान ठरवितांना.

(क) शाळामंडळाचे प्रश्न सोडवितांना.

(ड) शिक्षणासाठी खाजगी व्यक्तीकडून सहकार्य मिळविण्याकरिता.

(इ) जादा शिक्षकांची नेमणूक करतांना.

(ई) विशेष योजना आखताना.

(फ)

(ग)

(२) शाळामंडळाला पुष्कळ वेळा नगरपालिकेवर अवलंबून रहावे लागते हे खरे आहे काय? होय/नाही.

आपले उत्तर होकारार्थी असेल तर त्याचे परिणाम कोणत्या कामावर होतात? (योग्य उत्तरापुढे ✓ अशी खूण करा).

(अ) इमारतींची देखभाल करणे.

(ब) क्रीडांगणांची व्यवस्था करणे.

(क) शिक्षकांचे पगार वेळेवर करणे.

(ड) प्रशिक्षणासाठी शिक्षक पाठविणे.

(इ) जादा शिक्षक नेमणे.

(ई) दीर्घ स्वरूपाची योजना आखणे.

(फ) शैक्षणिक वातावरण न राहणे.

(ग)

<u>शाळा-मंडळ व राज्य सरकार</u>

(१) शाळामंडळाचे सभापती म्हणून राज्य सरकारशी चर्चा करण्याचा प्रसंग आला आहे काय ? होय/नाही.

आला असल्यास केव्हा ?

(२) शाळामंडळाची कामे व्यवस्थित व्हावीत म्हणून राज्य सरकारने कोणती जबाबदारी स्वीकारावी अशी आपली अपेक्षा आहे ? (योग्य उत्तरापुढे ✓ अशी खूण करा).

(अ) इमारती व क्रीडांगणे द्यावीत.
(ब) नगरपालिकेतील शिक्षण समिती रद्द करावी.
(क) नोकरवर्ग प्रशिक्षित करावा.
(ड) शिक्षणासाठी जो नगरपालिकेचा खर्च येतो तो १० टक्के-पर्यन्त वाढवावा.
(इ) नगरपालिकेकडून मिळणारे अनुदान शिक्षण फंडात जमा करावे.
(फ) कायद्याची अंमलबजावणी कडकपणे करावी.
(ग) शाळामंडळावर तज्ज्ञांच्या नेमणुका कराव्यात.
(ह)
(च)
(छ)

<u>संकीर्ण :</u>

(१) सक्तीच्या वयोगटातील मुलांना 'घरी ठेवणे' वा 'नोकरीला लावणे' असे करणे योग्य नाही याबद्दलची सूचना आपण संबंधितांना दिली आहे काय ? होय/नाही.

(२) सक्तीच्या वयोगटातील मुलांना शाळांपासून दूर ठेवल्याबद्दल कोणती कारवाई केली ? (योग्य उत्तरापुढे ✓ अशी खूण करा.)

(अ) पुन्हा पुन्हा सांगितले.

(ब) दंड केला.

(क) सामाजिक दडपण आणले.

(ड) पालकांचे प्रश्न सोडविण्यास मदत केली.

(इ) मुलांना आकर्षित करण्यासाठी खास कार्यक्रम केले.

(ई)

(फ)

(३) शाळामंडळासाठी नागरिकांचे कोणते सहकार्य मिळविले ?

(४) सभापती म्हणून आपणास कोणते अधिकार असावेत असे वाटते ?

(५) सभासदांचे मानधन वाढवावे असे आपणास वाटते काय ? (होय, नाही)

(६) सभासदांची 'खास पात्रता' म्हणून कोणती गोष्ट असावी असे आपणास वाटते ?

## परिशिष्ट क्र.४

## प्रशासनाधिका-यान्च्या मुलाखतीसाठी मुद्दे.

(१) वैयक्तिक माहिती.

(२) शाळांसाठी लागणा-या इमारतींचा व क्रीडांगणांचा प्रश्न कसा सुटेल ?

(३) कार्यालयीन काम करतांना कोणत्या अडचणी येतात ? त्या दूर करण्यासाठी काय करावे लागेल ?

(४) शाळामंडळाकडे आणखी कोणते अधिकार असावेत असे आपणास वाटते ?

(५) शाळामंडळात काम करणा-या शिक्षकांचे प्रश्न कोणते आहेत ?

(६) शाळामंडळापुढे येणारे आर्थिक पेचप्रसंग सोडविण्यासाठी काही मार्ग सांगा.

(७) शासनाने कोणती मदत करावी अशी अपेक्षा आहे ?

(८) इतर.

## परिशिष्ट क्र. ५

## शाळामंडळातील सभापतींच्या मुलाखतीसाठी मुद्दे

(१) वैयक्तिक माहिती.

(२) शाळामंडळाचे सभापती म्हणून काम करीत असतांना नगरपालिकेच्या संदर्भात आलेला अनुभव सांगा.

(३) इमारती व क्रीडांगणे यांची उणीव भरून काढण्यासाठी काही विचार सांगा.

(४) कार्यालयीन कामकाजात गती येण्यासाठी काय करता येईल असे आपणास वाटते?

(५) शाळामंडळाचा सभापती म्हणून नगरपालिकेकडून कोणत्या गोष्टींची अपेक्षा बाळगता ?

(६) शासनाने शाळामंडळासाठी काय करावे ?

(७) इतर.

## परिशिष्ट क्र. ६.

## पश्चिम महाराष्ट्र नगरपालिका शिक्षण महामंडळाच्या कार्यकारिणीतील सभासदांच्या मुलाखतीसाठी मुद्दे

(१) वैयक्तिक माहिती.

(२) शाळामंडळातील मुख्य प्रश्न कोणता आहे व तो सोडविण्यासाठी संघटना काय करते ?

(३) शाळामंडळाच्या सभासदांच्या प्रमुख अडचणी कोणत्या आहेत ?

(४) प्राथमिक शिक्षणाच्या (१९४७) कायद्यात कोणती सुधारणा संघटनेने सुचविली आहे ?

(५) संघटना शिक्षक, प्रशासनाधिकारी यांच्यासाठी कोणते काम करते ?

(६) इतर.

## परिशिष्ट क्र. ७.

### नगरपालिकांच्या अध्यक्षांच्या मुलाखतीसाठी मुद्दे

(१) नगरपालिकांचे शाळामंडळावर असलेल्या बंधनाचे स्वरूप स्पष्ट करा.

(२) नगरपालिकेतील शिक्षण समिती व शाळामंडळ यांच्या कार्यात वेगळेपणा आहे काय ? कोणता ?

(३) शाळांच्या इमारतींचा प्रश्न गंभीर का होत गेला व तो सोडविण्यास काय करता येईल ?

(४) शासनाने नगरपालिकांना कोणती मदत द्यावी ?

(५) इतर.

## परिशिष्ट क्र. ८.

### शाळामंडळातील सभासदांच्या मुलाखतीसाठी मुद्दे

(१) शाळामंडळाचे सभासद म्हणून काम करतांना प्रामुख्याने कोणत्या अडचणी जाणवल्या ?

(२) सभासदांना कोणत्या सोयी उपलब्ध करून दिल्या जाव्यात असे वाटते ?

(३) शाळामंडळाच्या सभेस भत्ता किती असावा ?

(४) इतर.

## परिशिष्ट - ९

## नगरपालिकेतील शिक्षण समितीची शक्ती व कार्ये

महाराष्ट्र म्युनिसिपल ॲक्ट १९६५ प्रमाणे प्रत्येक नगरपालिकेला शिक्षण समिती तयार करण्याचे बंधन कायदेशीर आहे. या समितीच्या शक्ती व कार्ये याबद्दलचे उपविधी महाराष्ट्र शासन राजपत्र भाग १-अ दि.३०-४-१९८६ (असाधारण) पृष्ठ १ ते १२ वर प्रसिध्द करण्यात आले आहे. ते पुढीलप्रमाणे आहेत.

### शिक्षण समितीच्या शक्ती व कार्ये

शिक्षण समितीकडे पुढील विषय दिले आहेत आणि ती समिती पुढे विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे शक्तीचा वापर करील व कामे पार पाडील.

(१) कलम ४९ पोट-कलम (२) च्या खंड (प) अन्वये नगरपालिका प्राधिकृत असल्यास प्राथमिक शाळा स्थापन करणे व त्या चालविणे आणि अशा बांधकामाच्या अंमलबजावणीस मंजुरी देणे आणि नगरपालिका प्राधिकृत नसेल त्या बाबतीत अंशदाने देवून अशा प्राथमिक शाळांच्या स्थापनेसाठी व त्या चालविणे-साठी तरतूद करणे.

(२) पूर्व-प्राथमिक व माध्यमिक शिक्षण संस्था, ग्रंथालये, संग्रहालये, व्यायामशाळा व आखाडे स्थापन करणे व ते चालविणे आणि कलम ४९, पोट-कलम (३) च्या खंड (ब) अन्वये अशी बांधकामे पार पाडण्यास मंजुरी देणे.

(३) कलम ४९, पोट-कलम (३) च्या खंड (ड) अन्वये लोकांसाठी संगीताची सोय करणे.

(४) कलम ४९, पोट-कलम (२) च्या खंड (द) अन्वये व संग्रहालये किंवा धर्मादाय स्वरूपाच्या अशा इतर संस्था धरून शैक्षणिक संस्था बांधणे, स्थापन करणे किंवा त्याची व्यवस्था ठेवणे यासाठी आधीच्या वर्षाच्या सर्वसाधारण महसुलाच्या २ टक्क्यापर्यन्त अंशदान देणे.

(५) विद्यार्थ्यांसाठी खाजगीरित्या चालविण्यात येणाऱ्या प्राथमिक किंवा माध्यमिक शाळांना किंवा वसतिगृहांना कलम ४९, पोट-कलम (२) खंड (य) अन्वये अनुदान किंवा देणग्या देणे.

(६) कलम ४९, पोट-कलम (२) च्या खंड (न) मध्ये उल्लेखलेल्या मर्यादास अधीन राहून, नगरपालिका क्षेत्रामध्ये कोणताही सार्वजनिक सत्कार, समारंभ, जत्रा करमणूक किंवा प्रदर्शन यासाठी तरतूद करणे.

(७) कलम ४९, पोट-कलम (७) मध्ये उल्लेखिलेल्या कोणत्याही शैक्षणिक किंवा धर्मादाय संस्थेशी नगरपालिकेने पूर्वी केलेल्या करारांच्या बाबतीत शक्तींचा वापर करणे.

(८) कलम ७२ अन्वये या उपविधीतील कोणत्याही पूर्वोक्त बाबीसाठी आवश्यक असेल त्या बाबतीत तरतूद करणे व वित्तीय मंजुरी देणे.